RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ६९ (२)] सोमवार, मे ११, २०२६/वैशाख २१, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २३५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ मे, २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१.

क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र४७२ (भाग-१)/झोपसु-१.— महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा. २८) (यापुढे याचा उल्लेख "सदर अधिनियम" असा करण्यात आला आहे.) मधील कलम ३४अ सह कलम ३५ मधील पोटकलम (१अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि अनुसूचित जोडलेल्या "शिखर तक्रार निवारण समिती" संबंधाने शासन अधिसूचना, गृहनिर्माण विभाग, क्रमांक झोपसु-१००८/प्र.क्र.१४३(१)/झोपसु-१, दिनांक ८ मार्च २०१७ अंशतः अधिक्रमित करून सदर अधिनियमाच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र शासन यास जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विहित केल्यानुसार शिखर तक्रार निवारण समित्या गठीत करीत आहे. सदर समित्यांचे स्तंभ (३) मध्ये विहित केल्याप्रमाणे अध्यक्ष व सदस्य असतील, सदर समित्या स्तंभ (४) मध्ये नमूद क्षेत्राकरिता तसेच, स्तंभ (५) मध्ये नमूद कार्यकक्षेनुसार सदर अधिनियमाच्या प्रयोजनार्थ पुढीलप्रमाणे कार्य करतीलः—

अनुसूची

अ. क्र.	शिखर तक्रार निवारण समिती	अध्यक्ष व एकूण सदस्य संख्या	समितीचे क्षेत्र	समितीची कार्यकक्षा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	शिखर तक्रार निवारण समिती - १ अ. अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव किंवा सचिव (गृहनिर्माण) - अध्यक्ष ब. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (म्हाडा) - सदस्य क. आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेले अतिरीक्त आयुक्त, बृहन्मुंबई म.न.पा. - सदस्य	अध्यक्ष - १ सदस्य -२	महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास)अधिनियम, ,१९७१ च्या कलम ३ अ नुसार राज्यातील सर्व घोषीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची क्षेत्रे	१. राज्य शासनाने विवक्षित आदेशान्वये सोपविलेली कोणतीही प्रकरणे. २. उच्च न्यायालयाने अथवा सर्वोच्च न्यायालयाने सोपविलेली प्रकरणे. ३. इतर तक्रार निवारण समितीस सोपविण्यात न आलेल्या विषयांची प्रकरणे. ४. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३५ च्या उपकलम १ अ मधील ब अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अशा कोणत्याही अधिकाऱ्यांनी पारित केलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही सूचना निर्देश, आदेश, निर्णय, परवानगी किंवा मंजुरी याविरूध्द खालील अपील प्रकरणे :- अ. कलम ३ क अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करणे ब. कलम १३ अंतर्गत आशय पत्रामधील (LOI) अटी शर्तींचा भंग अथवा योजनेस अवाजवी विलंब यानुषंगाने विकासकाची नियुक्ती रद्द करणे क. कलम १२ अंतर्गत निष्काषन आदेश जो कलम ३ड नुसार सुधारीत करण्यात आलेला आहे. (५) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूर केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव, आशय पत्र (LOI) यानुषंगाने दिलेल्या आदेशाविरूध्द अपिल प्रकरणे.

१अ	शिखर तक्रार निवारण समिती - २ अ. व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि. मुंबई, महाराष्ट्र- अध्यक्ष ब. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, म्हाडा-सदस्य क.सह सचिव किंवा उप सचिव, गृहनिर्माण विभाग (झो.पु.प्रा. कक्षाचे प्रभारी), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–सदस्य	अध्यक्ष - १ सदस्य -२	महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, ,१९७१ च्या कलम ३ अ नुसार राज्यातील सर्व घोषीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची क्षेत्रे	१. शिखर तक्रार निवारण समिती - १ कडून संदर्भित प्रकरणे २. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ कलम ३५ च्या उपकलम १ अ मधील ब अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या आधिकाऱ्यांनी पारित केलेल्या कोणत्याही नोटीस, निर्देश, परिपत्रक, निर्णय, आदेश, परवानगी किंवा मंजूरीविरुध्द दाखल करण्यात आलेले खालील अपिल प्रकरणे. अ. कलम ३३ अंतर्गत झोपडपट्टी धारकाच्या ताब्यातील निवासी सदनिका किंवा संरचना निष्कासीत करण्याबाबत दिलेल्या नोटीस. ब. कलम ३३ ब अंतर्गत पारित करण्यात आलेले आदेश. क. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीकरिता निवासी सदनिका किंवा संरचना निष्कासीत करण्याबाबत कलम ३८ अंतर्गत पारीत करण्यात आलेले आदेश. ३. भाडे अदा न केल्याबाबत आणि पुनर्वसन सदनिकांच्या वाटपाबाबतची प्रकरणे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चंद्रशेखर तरंगे,
शासनाचे उप सचिव.

HOUSING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 11th May, 2026.

NOTIFICATION

MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

No. Sankirn-2025/C.R.472(Part-1)/Zopasu-1.— In exercise of the powers conferred by section 34 A read with sub-section (*1A*) of section 35 of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 (Mah. XXVIII of 1971), hereinafter referred to "the said Act" and in partial supersession of the Government Notification, Housing Department No.Zopasu-1008/C.R.143(1)/Zopasu-1, dated the 8th March, 2017, in so far as it relates to the Apex Grievance Redressal Committee specified in the scheduled appended thereto, the Government of Maharashtra hereby constitutes the Apex Grievance Redressal Committees specified in column (2) of the Schedule appended hereto, consisting of the Chairperson and Members as specified in column (3) thereof, for the area specified in column (4) and with the scope specified in column (5) thereof, for the purposes of the said Act, as follows, namely:—

Schedule

Sr. No.	Apex Grievance Redressal Committee	Chairperson and number of Members	Area of Committee	Scope of Committee
(1)	(2)	(3)	(4)	(5)
	Apex Grievance Redressal Committee - 1 (a) Secretary or Principal Secretary or Additional Chief Secretary (Housing) - Chairperson. (b) Vice President and Chief Executive Officer (MHADA) - Member. (c) Additional Commissioner of Municipal Corporation of Greater Mumbai so authorized by the Municipal Commissioner MCGM-Member.	Chairperson-1 Member-2	All the areas of SRA in the State established under section 3A of the said Act.	1. Any issue referred by State Government by executive orders. 2. Any issue referred by High Court or Supreme Court. 3. The issues not specifically assigned to other AGRCs. 4. Appeal under clause (b) of sub-section (*1A*) of section 35 against any notice, direction, circular, decision, order, permission or approval issued or given by the Chief Executive Officer of Slum Rehabilitation Authority or any officer to whom the powers are delegated by the Chief Executive Officer regarding,— (a) declaration of Slum Rehabilitation Areas under section 3C ; (b) termination of Developer for inordinate delay or breach of conditions of Letter of Intent under section 13 ; (c) clearance order under section 12 as modified by section 3D ;

				5. Challenging the Slum RehabilitationScheme or Proposal, Letter of Intent or any approval issued by the Authority in this regard.
1A	Apex Grievance Redressal Committee - 2 (a) Managing Director, Shivshahi Punarvasan Prakalp Ltd.,Mumbai, Maharashtra - Chairperson (b) Chief Officer, Mumbai Board, Maharashtra Housing and Area Development Authority - Member (c) Joint Secretary or Deputy Secretary, Housing Department (in-charge of SRA desk), Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai.	Chairperson-1 Member-2	All the areas of SRA in the State established under section 3A of the said Act.	1. Any issue referred by Apex Grievance Redressal Committee - (1). 2. Appeal under clause (b) of sub-section (*1A*) of section 35 against any notice, direction, circular, decision, order, permission or approval issued or given by the Chief Executive Officer of Slum Rehabilitation Authority or any officer to whom the powers are delegated by the Chief Executive Officer regarding.— (a) notices issued for eviction of tenement or structures occupied by slum dwellers for implementation of Slum Rehabilitation Scheme under section 33 ; (b) Order for recovery of rent issued under section 33B ; (c) Order for demolition of tenement or structures for implementation of Slum Rehabilitation Scheme issued under section 38. 3. Any issues related to non-payment of rent and allotment of rehab tenement.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHANDRASHEKHAR TARANGE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.